**State Wildlife Clearance is granted for the Construction of the Twin Tube Tunnel Road between Thane and Borivali**

**Mumbai, 20 October, 2023:**

MMRDA is heading in an ambitious direction to alleviate traffic congestion between two of the most prominent districts in the Mumbai Metropolitan Region. The construction of the Twin Tube Tunnel road between Thane and Borivali under the Sanjay Gandhi National Park will result in about 1 hour reduction in the travel time between the two districts. However, the approval of the State Wildlife Board is crucial for this project. Fortunately, the wildlife clearance for the Twin Tube Project was awarded in the 22nd Meeting of the State Board for Wildlife under the chairmanship of the Hon'ble Chief Minister of Maharashtra Shri. Eknath Shinde. This much-awaited clearance now paves the way for the project to get further clearances.

Twin Tube Tunnel Road is a proposed, 2 Lanes each Highway Tunnel Road between Borivali and Thane in the state of Maharashtra. So, the project involves the construction of two tunnel roads with 2 separate lanes and one emergency lane in each of them. The proposed tunnel roads will connect Thane and Borivali under the Sanjay Gandhi National Park. The length of the tunnel road will be about 10.25 km and the length of the approach road will be 1.55 km. Therefore, the total length and diameter of each tunnel road will be about 11.8 km and 13.05 m, respectively. A dedicated ventilation system will be installed throughout the tunnel, and cross passages will be provided at every 300 m. Moreover, fire extinguishers, smoke detectors, LED lights, sign boards, and so on, will be established across the tunnel in appropriate locations to ensure the safety and convenience of the riders.

The construction of the Twin Tube tunnel road will comprise two civil packages and one ITS package, and civil packages 1 and 2 have already been awarded through tender. The contractor "M/S. Megha Engineering & Infrastructure Ltd." received LOA for packages 1 and 2 on 8th May 2023. The cost of the project is estimated to be around 16,600 Cr, including the cost of land acquisition. Four Tunnel Boring Machines (TBM) will be utilized to complete the construction duties in five years. Moreover, geotechnical investigation works have already been initiated by the team mobilized by the contractor.

Twin Tube tunnel road's construction demands the use of about 46.57 hectares of land, and around 35.54 hectares of the mentioned land is forest area under the control of the Government of Maharashtra. Hence, wildlife clearance becomes necessary for the proper initiation of the construction works. The acquisition of the wildlife clearance is wonderful news, as the proposed tunnel road is about to bring a lot of advantages to the people of Maharashtra.

One of the major benefits of the Twin Tube is that it substantially reduces the time of travel between Thane and Borivali. In particular, the tunnel road reduces the distance by 12 km, thereby allowing the riders to save about one hour. This will be a major breakthrough because people will have the opportunity to save a lot of time and money in terms of fuel costs every time they travel from Thane to Borivali and vice versa. Also, the new tunnel road will establish a direct connection between Thane Ghodbander Road and Western Express Highway at the side of Borivali.

Dr Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA, said **“We are constantly working towards improving the lives of people in and around Mumbai Metropolitan Region. The ways we embrace are always imbued with careful considerations to ensure that each one of them will take us one step closer to a promising future. Twin Tube tunnel road is one such marvellous endeavour that adds new meaning to the word “connectivity.” Therefore, getting the wildlife clearance is a real achievement for us, as we can now proceed forward to make this dream a reality.”**

**मुंबई महानगर प्रदेशातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पास मिळाली राज्य वन्यजीव मंडळाची परवानगी**

**ठाणे आणि बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पासाठी महत्त्वाचा टप्पा**

**मुंबई, २० ऑक्टोबर, २०२३:-**

मुंबई महानगर प्रदेशातील दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांना जोडून वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने महत्वाकांक्षी प्रकल्प एमएमआरडीएने हाती घेतला आहे. त्यानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यान भूमिगत भुयारी मार्गाच्या सहाय्याने ठाणे आणि बोरिवली दरम्यानचे अंतर कमी होणार आहे ज्यामुळे या भागातील प्रवासाच्या वेळेत सुमारे १ तासांची बचत होणार आहे. या प्रकल्पासाठी महत्त्वाची असलेली राज्य वन्यजीव मंडळाची परवानगी प्राप्त आहे. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षेखाली झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या २२ व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.

**मुंबई महानगरात पूर्व आणि पश्चिम जलद जोडणी करणारा हा प्रकल्प कसा असेल?**

मुंबई जिल्ह्याच्या पश्चिम उपनगरातील बोरीवली आणि ठाणे जिल्ह्याला भूमिगत मार्गाने जोडणाऱ्या सदर प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये १०.२५किमीचा बोगदा आणि १.५५ किमीचा पोहचमार्ग असा १३.०५मीटर अंतर्गत व्यासासह सुमारे १२ किमी लांबीचा दुहेरी भूमिगत बोगदा असणार आहे. या बोगद्याच्या दोन्ही बाजूस २+२ मार्गिकांसह आपत्कालीन मार्ग देखील असणार आहे. प्रत्येक ३०० मीटरवर पादचारी क्रॉस पॅसेज आणि प्रत्येक २ पादचारी क्रॉस पॅसेजनंतर वाहन क्रॉस पॅसेजची तरतूद आहे. प्रकल्पातील बोगद्यांचे बांधकाम हे आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे आणि चार टनल बोरिंग मशिनच्या मदतीने करण्यात येणार आहे. सुमारे १२ किमी लांबीच्या प्रकल्पातील ४.४३ किमी लांबीचा ही ठाणे जिल्ह्यातून तर ७.४ किमी लांबी ही बोरीवलीमधून प्रस्तावित आहे. प्रकल्पातील या बोगद्यांमध्ये अग्निशामक यंत्रे, पाण्याची नाळी, स्मोक डिटेक्टर, एलईडी लाईटचे संकेत फलक लावले जातील. तसेच NFPA५०२ च्या तरतुदींनुसार बोगद्यात नैसर्गिक किंवा यांत्रिक मार्गाने पुरेशी वायुविजन प्रणाली देखील उभारली जाणार आहे. प्रकल्पाची किंमत ही सुमारे रुपये १६६०० कोटी इतकी असून त्यामध्ये जमीन अधिग्रहणाच्या खर्चाचा ही समावेश आहे. प्रकल्पाची व्याप्ती आणि चॅलेंजस पाहता सदर प्रकल्प हा २ स्थापत्य आणि १ पॅकेज सुनियोजित वाहतूक प्रणाली संबंधित कामे अशा एकूण ३ पॅकेजेस मध्ये विभागला गेला आहे.


**असे असतील प्रकल्पाचे फायदे**

मुंबईच्या पश्चिम उपनगरातील बोरीवली आणि पूर्वेकडील ठाणे जिल्ह्याला जोडणारा सुमारे हा १२ किमीचा प्रकल्प संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून जाणारा अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि आवश्यक पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. ज्यामध्ये प्रदेशाची वाहतूक व्यवस्था सुधारून पर्यावरणीय स्थैर्य राखत नागरीकांचे जीवन आणखीन सुसह्य करण्याची क्षमता आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून पूर्व-पश्चिम लिंक रोड तयार होऊन

राष्ट्रीय महामार्ग ३ आणि ८ मधील अवजड व्यावसायिक वाहतुकीसाठी एक महत्त्वपूर्ण कॉरिडॉर म्हणून कार्यरत राहील. सद्यःस्थितीत ठाणे ते बोरिवली दरम्यान घोडबंदर मार्ग २३ किमी अंतराच्या प्रवासासाठी सकाळी आणि संध्याकाळी वर्दळीच्या वेळी (peak hours) एक ते दोन तास आणि इतर वेळी किमान एक तास लागतो. एमएमआरडीएमार्फत उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पामुळे प्रवासाच्या वेळेत आणि इंधनाची लक्षणीयरीत्या  बचत होऊन तासांचा प्रवास काही मिनिटांत करता येणार आहे. ज्यामुळे सामान्य प्रवाशांना, अवजड वाहतुकीस आणि व्यवसायांना मोठा दिलासा मिळेलच पण कार्बन उत्सर्जन कमी होऊन पर्यावरणाचे संवर्धन देखील होणार आहे.

**"एमएमआरडीएमार्फत उभारण्यात येणाऱ्या ठाणे - बोरीवली भूमिगत भुयारी मार्ग प्रकल्पासाठी राज्य वन्यजीव मंडळाची परवानगी मिळाल्याने प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण टप्पा साध्य झाला आहे. मुंबई आणि ठाणे सारख्या गजबजलेल्या शहरात भूमिगत बोगद्याचे बांधकाम हा सध्याच्या रहदारीच्या आव्हानांवर उपाय तर आहेच पण शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. हा उपक्रम शहरी नियोजनाच्या दृष्टिकोणातून पर्यावरण संरक्षणासह प्रगतीचा समतोल साधण्यासाठी आणि भविष्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी एक मॉडेल म्हणून अधोरेखित होईल."** असे एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भा.प्र.से., म्हणाले.




SHARDA GRAM
Link Road
DAHISAR WEST
COSMOS GARDENS
OLD MHB COLONY
SUKAR WADI
MHATRE WADI
WESTERN EXPRESSWAY BORIVALI
KHATAU ESTATE
Charkop Indl Est
KANAKIYA
KAMALA NAGAR
NH8
DAMU NAGAR
LOURDES COLONY
PADMABA NAGAR
PUSHPA PARK
SANJAY GANDHI NATIONAL PARK
Shendur Mountain 848 m
Kanheri Mountain 1327 m
Sanjay Gandhi National Park
Tulsi Lake
PATIL WADI
KASARWADAVALI
RITU ENCLAVE
GHODBANDAR ROAD THANE
TIKUJI NI WADI
HARISIDDHI PARK
JAWAHAR NAGAR
AZAD NAGAR
Road No 33
GANESH WADI
NH4
PANCH
© 2023 Microsoft Corporation © 2023 Maxar ©CNES (2023) Distribution Airbus DS © 2023 TomTom